# उपक्रम आय.सी.टी. विभागाचे,
# सक्षमीकरण शिक्षकांचे

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे
यांना सादर करण्यात येणारा नवोपक्रम


सादरकर्ता
डॉ. संदिप अप्पाराव पवार
अधिव्याख्याता,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी

मार्गदर्शक
डॉ. गजानन पाटील
प्राचार्य,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी



सादरीकरणाचे शैक्षणिक वर्ष
२०२२-२३

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी

## अनुक्रमणिका


| अ.नं. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | १ – ५ |
| २ | नवोपक्रमाची गरज व महत्व | ६ |
| ३ | नवोपक्रमाची उद्दिष्टे | ६ |
| ४ | नवोपक्रमाचे नियोजन | ६ – १५ |
| | i) उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण | ६ |
| | ii) संबंधित व्यक्तींशी, तज्ज्ञांशी चर्चा | ७ |
| | iii) आवश्यक साधनांचा विचार | ७ |
| | iv) करावयाच्या कृतींचा क्रम | ८ |
| | v) उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण | ९ |
| | vi) कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक) | ९ |
| | vii) उपक्रमासाठी इतरांची मदत | १० |
| | viii) उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे | १० |
| ५ | नवोपक्रमाची कार्यपद्धती | १६ – २४ |
| | I. पूर्वस्थितीचे निरीक्षण व त्यांच्या नोंदी | १६ |
| | II. कार्यवाहीदरम्यान केलेली निरीक्षणे व माहिती संकलन | १७ |
| | III. उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरीक्षणे व त्यांच्या नोंदी | १७ |
| | IV. कार्यवाही करताना आलेल्या अडचणी | १८ |
| | V. माहितीचे विश्लेषण : आलेख, तक्ते (आवश्यक वाटल्यास) | १९ |
| ६ | नवोपक्रमाची यशस्विता/ फलनिष्पत्ती (उद्दिष्टानुसार) | २५ – २६ |
| ७ | समारोप | २६ |
| ८ | संदर्भसूची | २७ |
| ९ | परिशिष्टे | २८ |

# प्रतिज्ञापत्र

मी **डॉ. संदिप अप्पाराव पवार** प्रतिज्ञापत्र लिहून देतो की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला **"उपक्रम आय.सी.टी. विभागाचे, सक्षमीकरण शिक्षकांचे"** हा नवोपक्रम माझ्या स्वत:च्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वत:ला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act १९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

स्पर्धकाची स्वाक्षरी

दिनांक : २५/११/२०२२

स्थळ : रत्नागिरी

नांव : डॉ. संदिप अप्पाराव पवार

कार्यालयाचा शिक्का

अधिव्याख्याता वर्ग-२,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
रत्नागिरी

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **डॉ. संदिप अप्पाराव पवार** हे माझ्या कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सादर केलेला **"उपक्रम आय.सी.टी. विभागाचे, सक्षमीकरण शिक्षकांचे"** हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष **२०२१-२२** मध्ये त्यांनी स्वत: राबविलेला असून ती त्यांच्या स्व परिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक : २५/११/२०२२ | कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

स्थळ : रत्नागिरी | नांव : डॉ. गजानन पाटील

महाराष्ट्र शासन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी

शिक्का : प्राचार्य,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
रत्नागिरी

**नवोपक्रमाचे शीर्षक : "उपक्रम आय.सी.टी. विभागाचे, सक्षमीकरण शिक्षकांचे"**

**1) प्रस्तावना**

कोरोना महामारीमुळे शिक्षकांना आय.सी.टी. आधारित अध्ययन-अध्यापन आणि नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानावर मार्गदर्शन मिळण्यासाठी केंद्र व राज्य स्तरावरून अनेकविध प्रयत्न झाले. जिल्हास्तरावरून या प्रयत्नांना पाठबळ मिळण्यासाठी आय.सी.टी. विभागाने पुढाकार घेतला. शिक्षकांच्या आय.सी.टी. विषयक गरजांमधून तालुकानिहाय आय.सी.टी. कक्षांची निर्मिती झाली. विविध उपक्रम राबवून जिल्ह्यात तंत्रस्नेही चळवळ विकसित होऊ लागली आणि यातूनच चांगले काम केलेल्या तंत्रस्नेहींसाठी जिल्हास्तरावर आदर्श आय.सी.टी. शिक्षक पुरस्काराचा जन्म झाला. या सर्व प्रयत्नांमधून शिक्षकांच्या सक्षमीकरणाची वाटचाल सध्या दमदारपणे होत आहे. या सर्व प्रयत्नांची चर्चा सदरील नवोपक्रमामध्ये केली आहे.

**1.1 आय.सी.टी. कक्षामार्फत राबविलेले उपक्रम**

आय.सी.टी. कक्षामार्फत शिक्षकांना मार्गदर्शन मिळावे या हेतूने शैक्षणिक वर्ष 2021-22 मध्ये कोरोना कालावधीत व त्यानंतर विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. त्यापैकी काही ठळक उपक्रम पुढीलप्रमाणे-

**मुलभूत (Basic) आय.सी.टी. कौशल्य प्रशिक्षण व इ-प्रमाणपत्र वितरण**

मुलभूत (Basic) आय.सी.टी. कौशल्यांवर आधारित तीन दिवसीय ऑनलाईन तंत्रस्नेही प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. यामध्ये मोबाईल टीव्ही, दूरदर्शन व रेडीओ चॅनेलच्या आधारे अध्ययन व अध्यापन, आय.सी.टी. आधारित अध्ययन व अध्यापन तंत्रे, इ-कंटेंट, इ-रिसोर्सेस, इ-मूल्यमापन तंत्रे, पीडीएफ, टायपिंग टूल्स, व्हिडीओ निर्मिती या विषयांवर आधारित तीन दिवसांत पाच सत्रांमध्ये शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले. ही सर्व सत्रे DIET च्या युट्यूब चॅनेलवरून थेट प्रसारित करण्यात आली. त्यानंतर या सत्रांची परिणामकारकता पाहण्यासाठी Google form आधारित प्रश्नावली तयार करून प्रसारित करण्यात आली. यामध्ये सर्व सहभागी व्यक्तींना Google form + Certifyem द्वारे इ-प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.

**अद्ययावत (Advance) आय.सी.टी. कौशल्य प्रशिक्षण व इ-प्रमाणपत्र वितरण**

अद्ययावत (Advance) आय.सी.टी. कौशल्यांवर आधारित तीन दिवसीय ऑनलाईन तंत्रस्नेही प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. यामध्ये अध्ययनाचे व्यवस्थापन (LMS), माहिती विश्लेषण तंत्रे, मोबाईल ॲप निर्मिती व प्रकाशन, सायबर गुन्हे व सायबर सुरक्षितता, पोस्टर व इन्फोग्राफिक

निर्मिती, इ-प्रमाणपत्र निर्मिती, MyGov प्रश्नमंजुषा, NCERT द्वारा राष्ट्रीय आय.सी.टी. पुरस्कार या विषयांवर आधारित तीन दिवसांत सहा सत्रांमध्ये शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात आले. ही सर्व सत्रे DIET च्या युट्यूब चॅनेलवरून थेट प्रसारित करण्यात आली. त्यानंतर या सत्रांची परिणामकारकता पाहण्यासाठी Google form आधारित प्रश्नावली तयार करून प्रसारित करण्यात आली. यामध्ये सर्व सहभागी व्यक्तींना Google form + Certifyem द्वारे इ-प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले.

**तालुकानिहाय आय.सी.टी. कक्षाच्या WhatsApp गटांची निर्मिती व माहिती प्रसारण**

प्रत्येक तालुक्यात आय.सी.टी. कक्ष स्थापन झाल्यानंतर Section based Google form च्या आधारे नांव नोंदणी करून तालुकानिहाय आय.सी.टी. कक्षाच्या WhatsApp गटांची निर्मिती करण्यात आली. हे सर्व गट सतत कार्यशील व अद्ययावत राहण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. यासाठी केंद्र, राज्य व जिल्हास्तरावरून प्रसंगानुरूप येणारे ऑनलाईन/ ऑफलाईन उपक्रम, प्रशिक्षण, कोर्स, योजना, प्रश्नमंजुषा, उदबोधन, इ. च्या माहितीचा प्रसार व प्रचार तसेच MoE, NCERT official, MSCERT, DIET मार्फत यु-ट्यूब चॅनेलवरून थेट (live) प्रसारित होणाऱ्या उदबोधन सत्रांची माहिती, लिंक, पोस्टर, इ. प्रसारित करण्यात आले.

**यशोगाथा (E-Content) निर्मिती व लेखन- ऑनलाईन उदबोधन सत्र**

केंद्र, राज्य व जिल्हास्तरावरून दरवर्षी विविध कारणांसाठी Video, Audio, Info-graphic, Article, इ. स्वरूपात यशोगाथा तयार करून पाठविण्यासंबंधी शिक्षकांना आवाहन करण्यात येते. याबद्दल शिक्षक व पर्यवेक्षीय यंत्रणा यांना सर्वसमावेशक मार्गदर्शन मिळावे म्हणून आय.सी.टी. कक्षामार्फत यशोगाथा (E-Content) निर्मिती व लेखन कसे करावे यावर आधारित एकदिवसीय ऑनलाईन उदबोधन सत्र आयोजित करण्यात आले. हे सत्र DIET च्या युट्यूब चॅनेलवरून थेट प्रसारित करण्यात आले.

**आय.सी.टी. आधारित आनंददायी शिक्षण- ऑनलाईन उदबोधन सत्र**

आय.सी.टी. विषयक संसाधनांचा दि. 28/04/2020 चा शासन निर्णय आणि निपुण भारत अभियानाचा दि. 28/10/2021 चा शासन निर्णय यांना अनुसरून शिक्षकांना आय.सी.टी. आधारित आनंददायी शिक्षणाचे विविध मार्ग माहीत व्हावेत यासाठी जिल्हा परिषद, रत्नागिरी आणि आय.सी.टी. विभाग, DIET रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय ऑनलाईन उदबोधन सत्र आयोजित करण्यात आले. हे सत्र DIET च्या युट्यूब चॅनेलवरून थेट प्रसारित करण्यात आले.

**जिल्हा व तालुक्यांचे स्वतंत्र यु-ट्यूब चॅनेल व वार्षिक अंक आधारित फ्लिप बुक निर्मिती**

कोरोना कालावधीत शिक्षणातील समग्र घटकांना मार्गदर्शन मिळावे यासाठी आय.सी.टी. विभाग, DIET रत्नागिरी मार्फत दिशा (**D**IET's **I**nitiative for **S**takeholders' **H**olistic **A**dvancement)- ऑनलाईन व्यावसायिक विकास मंच स्थापन करण्यात आला. यासाठी स्वतंत्र यु-ट्यूब चॅनेलची निर्मिती करण्यात आली. जिल्ह्याप्रमाणेच तालुक्यांचेही यु-ट्यूब चॅनेल असावेत यासाठी साधन व्यक्तींना मार्गदर्शन करून प्रत्येक तालुक्यातील गट साधन केंद्रांच्या (BRC) स्वतंत्र यु-ट्यूब चॅनेलची निर्मिती करण्यात आली. यावर चांगल्या यशोगाथा, शाळा भेटीचे व्हीडीओ, इ. अपलोड करण्यात येत आहेत.

कोरोना कालावधीतील DIET रत्नागिरीच्या कामगिरीवर आधारित वार्षिक अंक तयार करून तो फ्लिप बुकच्या स्वरूपात प्रकाशित करण्यात आला. जिल्ह्याप्रमाणेच प्रत्येक तालुक्याचेही वार्षिक अंक असावेत यासाठी कोरोना कालावधीतील कामकाजावर आधारित प्रत्येक तालुक्यातील गट साधन केंद्रांचा (BRC) वार्षिक अंक आय.सी.टी. कक्षामार्फत तयार करण्यात आला व तो फ्लिप बुक स्वरूपात प्रकाशित करण्यात आला.

**जिल्हास्तरीय आदर्श आय.सी.टी. शिक्षक पुरस्कार**

कोरोना कालावधीत शाळा बंद असतानाही शिक्षण सुरु ठेवण्याचे अनेक शिक्षकांनी प्रयत्न केले. आय.सी.टी. कक्षामार्फत राबविलेल्या उपक्रमांपासून प्रेरणा घेऊन बरेच शिक्षक तंत्रस्नेही बनले. जे आधीच तंत्रस्नेही होते त्यांनी उत्कृष्टतेकडे वाटचाल केली. या शिक्षकांचा यथोचित सन्मान व्हावा, त्यांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळावे यासाठी राष्ट्रीय आदर्श आय.सी.टी. शिक्षक पुरस्कार, NCERT, नवी दिल्ली यांच्याप्रमाणेच जिल्हास्तरीय आदर्श आय.सी.टी. शिक्षक पुरस्काराचे नियोजन करण्यात आले. यासाठी चार टप्प्यांमध्ये रीतसर निवड प्रक्रिया राबविण्यात आली. 11 मे, 2022 राष्ट्रीय तंत्रज्ञान दिनादिवशी मा. डॉ. श्रीम. इंदुराणी जाखड, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांच्या हस्ते पुरस्कार वितरीत करण्यात आले. निवड प्रक्रियेसाठी चार टप्प्यांमध्ये एकूण 100 गुण निश्चित करण्यात आले. त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे-

**टप्पा-1 :** पात्रता परीक्षा (Performance Test) : 30 गुण

1. विशेष शैक्षणिक अर्हता व पात्रता
2. ICT विषयक विशेष योग्यता, सामाजिक कार्य, पुरस्कार, इ.
3. सन 2019 ते 2022 पर्यंतचे ICT आधारित शैक्षणिक उपक्रम

4. ICT विषयक प्रमुख संकल्पनांचे ज्ञान (Knowledge Test)
5. ICT आधारित योजना/ प्रशासकीय कामकाजाचे ज्ञान

वरील निकषांच्या आधारे सहभागी शिक्षकांची Google Form+ Form Timer द्वारे 1 तासाची ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली. सर्वाधिक गुणप्राप्त शिक्षकांमधून प्रत्येक विभागातून 3 पुरुष व 3 महिला शिक्षिका याप्रमाणे 12 जणांची खालील सर्व टप्प्यांसाठी निवड केली गेली.

**टप्पा-2 :** केंद्रप्रमुख शिफारस : 20 गुण

सचोटी, चारित्र्य, प्रमाणिकपणा, नेतृत्व कौशल्य, ICT विषयक कौशल्य, विनयशील, सहकार्यशील, क्रियाशील, सृजनशील या मुद्द्यांच्या आधारे केंद्रस्तरावर केंद्रप्रमुख यांचे मत निवडीसाठी विचारात घेतले गेले.

**टप्पा-3 :** गटशिक्षणाधिकारी शिफारस : 20 गुण

सचोटी, चारित्र्य, प्रमाणिकपणा, नेतृत्व कौशल्य, ICT विषयक कौशल्य, विनयशील, सहकार्यशील, क्रियाशील, सृजनशील या मुद्द्यांच्या आधारे तालुकास्तरावर गटशिक्षणाधिकारी यांचे मत निवडीसाठी विचारात घेतले गेले.

**टप्पा-4 :** दस्तऐवज पडताळणी व मुलाखत : 30 गुण

वरील तीनही टप्प्यांमध्ये यशस्वी ठरलेल्या उमेदवारांना जिल्हास्तरावर 1 : 3 याप्रमाणे मुलाखतीसाठी बोलावण्यात आले. जिल्हास्तरावर सर्वांची दस्तऐवज पडताळणी करून टप्पा- 1 ते 3 मध्ये चुकीची व खोटी माहिती सादर केलेल्या उमेदवारांची उमेदवारी रद्द करण्यात आली व त्यानंतरच उर्वरित शिक्षकांच्या खालीप्रमाणे मुलाखती घेण्यात आल्या.

*1. सादरीकरण कौशल्य : 10 गुण*

शिक्षकांनी मागील 3 शैक्षणिक वर्षात ICT आधारित केलेल्या कामकाजाचे 10 मिनिटांपर्यंत PPT/ Video च्या आधारे सादरीकरण केल्यानंतर स्पष्टीकरण, आत्मविश्वास, आशयाचा दर्जा, वेळेचे नियोजन या मुद्यांवर आय.सी.टी. कक्षामार्फत सादरीकरणाचे मूल्यमापन केले गेले.

*2. ICT विषयक प्रात्यक्षिक : 10 गुण*

शिक्षकांचे ICT विषयक प्रात्यक्षिक ज्ञान तपासण्यासाठी DIET च्या आय.सी.टी. लॅबमध्ये संगणकावर दोन प्रात्यक्षिके 10 मिनिटांपर्यंत पूर्ण करणे बंधनकारक होते. त्यानंतर 5 मिनिटे स्मार्ट फोनवर आधारित प्रात्यक्षिक घेण्यात आले. अचूकता, गतिशीलता, वेळेचे नियोजन या मुद्द्यांवर प्रात्यक्षिकांचे मूल्यमापन केले गेले.

*3. प्रश्नोत्तरे चर्चा व एकूण प्रभाव : 10 गुण*

ICT विषयक ज्ञान, विद्यार्थ्यांचे शिकणे सुलभ होण्यासाठी केलेले प्रयत्न, सहकारी शिक्षकांना दिलेले मार्गदर्शन, समस्या निराकरण, निर्णयशक्ती आणि एकूण प्रभाव तपासण्यासाठी तज्ज्ञांनी विचारलेल्या प्रश्नोत्तरांमधील शिक्षकांचा सहभाग व मत विचारात घेतले गेले.

वरीलप्रमाणे अत्यंत पारदर्शी निवड प्रक्रिया राबवून जिल्हास्तर आदर्श आय.सी.टी. शिक्षक पुरस्काराचे वितरण खालीप्रमाणे करण्यात आले-

| अ.नं. | तक्ता क्र.1 : पुरस्काराचे विभाग (ICT) | संख्या | स्वरूप |
|---|---|---|---|
| **1** | प्राथमिक स्तर (1 ते 8) : पुरुष शिक्षक | 1 | प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व ICT कीट |
| **2** | प्राथमिक स्तर (1 ते 8) : महिला शिक्षिका | 1 | प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व ICT कीट |
| **3** | माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालय स्तर (9 ते 12 व D.El.Ed.) : पुरुष शिक्षक | 1 | प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व ICT कीट |
| **4** | माध्यमिक, उच्च माध्यमिक व अध्यापक विद्यालय स्तर (9 ते 12 व D.El.Ed.) : महिला शिक्षिका | 1 | प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व ICT कीट |

## जिल्हास्तरीय आदर्श BRC सदस्य पुरस्कार

तालुक्याच्या गटसाधन केंद्रामध्ये काम करणारे विषय साधन व्यक्ती, विशेष तज्ज्ञ व विशेष शिक्षक यांच्या सहकार्यामुळेच जिल्हा किंवा राज्यस्तरावरील कोणतेही काम, उपक्रम, प्रशिक्षण कार्यक्रम प्रभावी व यशस्वी होण्यास मदत होते. अनेकविध व व्यापक अशी कामे नि:स्वार्थी भावनेने करणाऱ्या व ICT चा वापर करून गतिमान कामकाज करणाऱ्या BRC सदस्यांना कौतुकाची थाप मिळावी, त्यांना प्रेरणा व प्रोत्साहन मिळावे यासाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते 11 मे, 2022 राष्ट्रीय तंत्रज्ञान दिनादिवशी पुरस्कार वितरीत करण्यात आले. पुरस्कार निवडीचे सर्व निकष, स्वरूप, इ. जिल्हास्तरीय आदर्श आय.सी.टी. शिक्षक पुरस्काराप्रमाणेच होते.

| अ.नं. | तक्ता क्र.2 : पुरस्काराचे विभाग (BRC) | संख्या | स्वरूप |
|---|---|---|---|
| **1** | BEST BRP AWARD : विषय साधन व्यक्ती | 1 | प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व ICT कीट |
| **2** | BEST BRP AWARD : विषय तज्ज्ञ | 1 | प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व ICT कीट |
| **3** | BEST BRP AWARD : विशेष शिक्षक | 1 | प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह व ICT कीट |

**2) नवोपक्रमाची गरज व महत्व**

कोरोना महामारीमुळे शाळा बंद असल्याने शिक्षण सुरु ठेवण्यासाठी आय.सी.टी.ची साधने व तंत्रांचा वापर करून अनेक शिक्षक विविध मार्गांनी नाविन्यपूर्ण उपक्रम व प्रयोग राबवू लागले. या सर्व प्रयत्नांना पाठबळ देणे व शासनाच्या आय.सी.टी. विषयक नाविन्यपूर्ण बाबींची माहिती शिक्षकांना होणेसाठी आय.सी.टी. कक्षामार्फत उपक्रम राबविणे गरजेचे वाटले.

आय.सी.टी. विषयक कौशल्ये शिक्षकांनी आत्मसात करावीत, कोणत्याही समस्यांचे तात्काळ निराकरण होऊन शिक्षकांना मार्गदर्शन मिळावे आणि त्यांचे सक्षमीकरण होऊन तंत्रस्नेही शिक्षक चळवळ वृद्धिंगत व्हावी यासाठी हा नवोपक्रम हाती घेतला.

दरवर्षी NCERT, नवी दिल्ली यांच्यामार्फत राष्ट्रीय आदर्श आय.सी.टी. शिक्षक पुरस्कार दिला जातो. त्याच्या निवडीचे निकषही खूप उच्च दर्जाचे आहेत. असा पुरस्कार जिल्हास्तरावरही दिला गेला तर राष्ट्रीय पुरस्काराची तयारी होईल आणि चागंल्या शिक्षकांचा गुणगौरवही होईल यासाठी जिल्हास्तर आदर्श आय.सी.टी. शिक्षक पुरस्काराची रचना करणे महत्वाचे वाटले.

**3) नवोपक्रमाची उद्दिष्टे**

1. शिक्षकांच्या आय.सी.टी. कौशल्यविषयक गरजांची निश्चिती करणे.
2. शिक्षकांच्या आय.सी.टी. विषयक कौशल्यांच्या विकसनासाठी गरजाधिष्ठीत उपक्रमांची अंमलबजावणी करून प्रत्याभरण घेणे.
3. उल्लेखनीय काम करणारे आदर्श तंत्रस्नेही शिक्षक व BRC सदस्य यांचा गुणगौरव करणे.
4. आय.सी.टी. कक्षामार्फत राबविलेल्या उपक्रमांची परिणामकारकता अभ्यासणे.

**4) नवोपक्रमाचे नियोजन**

**i) उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण**

शैक्षणिक वर्ष 2019-20 मध्ये जिल्हा व तालुकास्तरावर दोन दिवसीय तंत्रस्नेही शिक्षक प्रशिक्षण संपन्न झाले. सदरील प्रशिक्षणाच्या अंमलबजावणी व अनुधावनावेळी असे लक्षात आले की, बहुतांशी शिक्षकांना आय.सी.टी. विषयक संसाधनांचा आपल्या अध्यापनात वापर करता येत नाही.

शैक्षणिक वर्ष 2020-21 व 2021-22 मध्ये कोरोना महामारीमुळे बरेच दिवस शाळा बंद होत्या. शिक्षण सुरु ठेवण्यासाठी सर्वच शिक्षकांना आय.सी.टी. विषयक संसाधनांची मदत घ्यावी लागली. काही तंत्रस्नेही शिक्षकांकडून इतर शिक्षकांना मदतही मिळाली परंतु बहुतांशी शिक्षकांना

आय.सी.टी. कौशल्यविषयक मार्गदर्शन खूप कमी प्रमाणात उपलब्ध झाले. बरेच शिक्षक अध्यापनातील आय.सी.टी. च्या वापराविषयी अनभिज्ञ दिसले.

कोविड कालावधीत केलेल्या सर्वेक्षणातून आय.सी.टी. विषयक संसाधनांचा वापर, विविध शैक्षणिक वेबसाईटस, मोबाईल अप्लीकेशन्स यांचा वापर कितपत करता येतो व आय.सी.टी. विषयक कोणत्या घटकावर मार्गदर्शन हवे यावर गुगल फॉर्म आधारित माहिति मिळवण्यात आली. शिक्षकांच्या आय.सी.टी. कौशल्यविषयक गरजा समजल्या.

**ii) संबंधित व्यक्तींशी, तज्ज्ञांशी चर्चा**

1. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीमती इंदुराणी जाखड यांच्या मार्गदर्शनाखाली काही उपक्रमांची निर्मिती व अंमलबजावणी करण्यात आली.
2. आय.सी.टी. कक्षाची निर्मिती व अंमलबजावणीसंदर्भात दर महिन्यास होणाऱ्या जिल्हा गुणवत्ता कक्षात चर्चा करण्यात आली. यामध्ये प्रत्येक तालुक्याच्या गटशिक्षणाधिकारी व तज्ज्ञ सदस्य यांचे अनुमोदन वारंवार मिळत गेले.
3. MKCL मुंबई चे रत्नागिरी जिल्हा समन्वयक श्री. संतोष कोलते (कोलते कॉम्प्यूटर्स, रत्नागिरी) यांचेसोबत तांत्रिक मुद्द्यांवर चर्चा करून विविध प्रकारचे ऑनलाईन उपक्रम राबविताना मदत व सल्ला घेण्यात आला.
4. खेड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री. श्रीधर शिगवण यांनी त्यांच्या तालुक्यातील सर्व शिक्षकांनाआय.सी.टी. विषयक मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेकडे मागणी नोंदविली. त्यांच्यासोबत झालेल्या चर्चेस अनुसरून उपक्रमांची निर्मिती व अंमलबजावणी करण्यात आली.

**iii) आवश्यक साधनांचा विचार**

सदरील नवोपक्रमाच्या पूर्ततेसाठी खालील साधनांचा वापर करण्यात आला आहे.

| उद्दिष्टे | तक्ता क्र.3 : माहिती संकलन साधने | माहिती विश्लेषण तंत्रे |
|---|---|---|
| 1. गरजांची निश्चिती करणे | 1. तंत्रस्नेही प्रशिक्षण अनुधावन- पडताळा सूची<br>2. आय.सी.टी. कौशल्य विषयक पूर्व चाचणी- गुगल फॉर्म | टक्केवारी,<br>सरासरी |
| 2. उपक्रमांची अंमलबजावणी करून प्रत्याभरण घेणे | 1. अंमलबजावणी- झूम ॲप, यु-ट्यूब चॅनेल, WhatsApp गट, इ.<br>2. प्रत्याभरण- गुगल फॉर्म फीडबॅक लिंक | टक्केवारी,<br>सरासरी |

| उद्दिष्टे | तक्ता क्र.3 : माहिती संकलन साधने | माहिती विश्लेषण तंत्रे |
|---|---|---|
| 3. आदर्श तंत्रस्नेही शिक्षक व BRC सदस्य यांचा गुणगौरव करणे | 1. गुगल फॉर्म- पात्रता परीक्षा<br>2. ICT lab आधारित प्रात्यक्षिक परीक्षा- MS Office<br>3. दस्तऐवज पडताळणी<br>4. मुलाखत | टक्केवारी,<br>सरासरी |
| 4. आय.सी.टी. कक्षामार्फत राबविलेल्या उपक्रमांची परिणामकारकता अभ्यासणे | 1. आय.सी.टी. कौशल्य विषयक पूर्व चाचणी- गुगल फॉर्म<br>2. आय.सी.टी. कौशल्य विषयक उत्तर चाचणी- गुगल फॉर्म | टक्केवारी,<br>सरासरी,<br>आलेख (Graphs) |

**iv) करावयाच्या कृतींचा क्रम**

सदरील नवोपक्रम पूर्ततेसाठी खालील कृतींचा क्रमबद्ध पद्धतीने अवलंब करण्यात आला.

1. शिक्षकांच्या आय.सी.टी. कौशल्यविषयक गरजांचा शोध घेणे.
2. पर्यवेक्षीय यंत्रणेच्या मदतीने जिल्हा व तालुकास्तरावर आय.सी.टी. कक्ष स्थापन करणे.
3. तालुकानिहाय आय.सी.टी. कक्षाचे WhatsApp गट स्थापन करणे.
4. मागणीनिहाय प्रशिक्षण/ मार्गदर्शनाचे नियोजन करणे.
5. शिक्षकांना आय.सी.टी. कौशल्य विकसनासाठी मार्गदर्शन करणे.
   - तंत्रस्नेही प्रशिक्षण- मुलभूत स्तर (Basic)
   - तंत्रस्नेही प्रशिक्षण- अद्ययावत स्तर (Advance)
6. केंद्र, राज्य व जिल्हास्तरावरून येणारे उपक्रम, प्रशिक्षण, कोर्स, योजना, प्रश्नमंजुषा, इ. ची माहिती प्रसारित करणे आणि ऑनलाईन उदबोधन सत्रे आयोजित करणे.
7. जिल्हास्तरीय आदर्श आय.सी.टी. शिक्षक पुरस्काराचे नियोजन व अंमलबजावणी करणे.
   - ऑनलाईन पात्रता परीक्षा (Performance Test)
   - दस्तऐवज तपासणी (Document Verification)
   - आय.सी.टी. कौशल्यविषयक प्रात्यक्षिक परीक्षा (Demo)
   - जिल्हास्तरावर मुलाखती (Interview)
   - अंतिम निकाल व पुरस्कार वितरण समारंभ
8. जिल्हास्तरीय आदर्श BRC सदस्य पुरस्काराचे नियोजन व अंमलबजावणी करणे.
   - ऑनलाईन पात्रता परीक्षा (Performance Test)

- दस्तऐवज तपासणी (Document Verification)
- आय.सी.टी. कौशल्यविषयक प्रात्यक्षिक परीक्षा (Demo)
- जिल्हास्तरावर मुलाखती (Interview)
- अंतिम निकाल व पुरस्कार वितरण समारंभ

9. प्राप्त माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करून आय.सी.टी. कक्षामार्फत राबविलेल्या उपक्रमांची परिणामकारकता अभ्यासणे.
10. नवोपक्रमाची अंतिम परिपूर्ती करणे.

**v) उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण**

जिल्हा व तालुकानिहाय आय.सी.टी. कक्ष कार्यान्वित झाल्यामुळे खालील बदल दिसून आले-

1. आय.सी.टी. विषयक कोणत्याही शंकांचे निरसन होण्यासाठी आणि मार्गदर्शन व माहिती मिळवण्यासाठी शिक्षक, पर्यवेक्षीय यंत्रणा स्वयंस्फूर्तीने आय.सी.टी. कक्षाची मदत घेऊ लागले.
2. शिक्षकांमध्ये आय.सी.टी. कक्षाचा सदस्य होण्याचे प्रमाण वाढले.
3. आय.सी.टी. विषयक शासन प्रयत्नांची माहिती झाली, तंत्रस्नेही शिक्षकांचे प्रमाण वाढले.
4. प्रत्येक तालुक्यात गट साधन केंद्राचे (BRC) स्वतंत्र यु-ट्यूब चॅनेल सुरु झाले.
5. आय.सी.टी. कक्षाने प्रसंगानुरूप मदत दिल्याने यशोगाथा लेखन, ऑनलाईन निष्ठा प्रशिक्षण 2.0, निष्ठा प्रशिक्षण 3.0, वरिष्ठ व निवड श्रेणी प्रशिक्षण, राज्य व जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार, इ. यशस्वीपणे पार पडले.

**vi) कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक)**

| **तक्ता क्र.4 : कार्यवाहीचे टप्पे** | **वेळापत्रक** |
|---|---|
| पूर्वीच्या तंत्रस्नेही प्रशिक्षणाचे अनुधावन | शैक्षणिक वर्ष 2019-20 |
| कोरोना कालावधीतील ऑनलाईन मार्गदर्शन | शैक्षणिक वर्ष 2020-21 |
| तालुकास्तरीय आय.सी.टी. कक्षाची स्थापना, WhatsApp गटांची निर्मिती, उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार | डिसेंबर, 2020 ते आजपर्यंत |
| तालुकास्तरीय आय.सी.टी. कक्षाची पुनर्रचना व सक्षमीकरण | जून, 2021 |
| आय.सी.टी. कौशल्यविषयक पूर्वचाचणी | जुलै, 2021 |
| ऑनलाईन तंत्रस्नेही प्रशिक्षण नियोजन व चर्चा | जुलै, 2021 |

| **तक्ता क्र.4 : कार्यवाहीचे टप्पे** | **वेळापत्रक** |
|---|---|
| मुलभूत (Basic) आय.सी.टी.कौशल्य- ऑनलाईन तंत्रस्नेही प्रशिक्षण अंमलबजावणी व अनुधावन | ऑगस्ट, 2021 |
| अद्ययावत (Advance) आय.सी.टी.कौशल्य- ऑनलाईन तंत्रस्नेही प्रशिक्षण अंमलबजावणी व अनुधावन | सप्टेंबर, 2021 |
| माहितीचा प्रचार-प्रसार व उदबोधन सत्रांचे आयोजन | ऑक्टोबर, 2021 ते एप्रिल, 2022 |
| आदर्श ICT शिक्षक व आदर्श BRC सदस्य पुरस्कार- नियोजन व अंमलबजावणी | एप्रिल, 2022 ते मे, 2022 |
| आय.सी.टी. कौशल्यविषयक उत्तर चाचणी | जून, 2022 |

**vii) उपक्रमासाठी इतरांची मदत**

1. आय.सी.टी. कक्ष अंतर्गत विविधांगी ऑनलाईन उपक्रम राबविण्यामध्ये ICT विभाग, SCERT पुणे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी येथील प्राचार्य, सर्व अधिकारी, विषय सहायक आणि कर्मचारी यांची मोलाची मदत झाली.
2. आय.सी.टी. पुरस्कार निवड समिती तज्ज्ञ म्हणून DIET मधील अधिकारी श्री. सुशील शिवलकर, श्रीमती नम्रता शेजाळ, श्रीमती स्नेहल पेडणेकर, श्रीमती ज्योती निंबाळकर, श्रीमती दीपा सावंत, श्रीमती सीमा इंगळे यांची मदत झाली.
3. उपक्रमांच्या अंमलबजावणी व अनुधावनासाठी जिल्हा परिषद शिक्षण विभाग, तालुकास्तरावर गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, तंत्रस्नेही केंद्रप्रमुख, तंत्रस्नेही साधन व्यक्ती, तंत्रस्नेही माध्यमिक व प्राथमिक शिक्षक यांची मदत झाली.
4. प्रत्येक टप्प्यावरील उपक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी करताना जिल्ह्यातील तंत्रस्नेही शिक्षक श्री. नारायण शिंदे, श्री. हनुमान गिराम, श्री. अमोल वाघमारे, श्री. मयुरेश माने यांची मदत झाली.
5. आय.सी.टी. कक्ष स्थापन केल्यानंतर प्रत्येक तालुक्यातील सायबर कॅफे/ खाजगी संगणक तज्ज्ञ यांची निमंत्रित सदस्य म्हणून मदत झाली.

**viii) उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे**

आय.सी.टी. विषयक उपक्रमांसाठी सादर करावयाचे पुरावे पुढीलप्रमाणे-

| अ.नं. | उपक्रमाचे नांव | तक्ता क्र.5 : पुराव्याचा तपशील |
|---|---|---|
| 1 | दिशा- ऑनलाईन व्यावसायिक विकास मंचची स्थापना | https://www.youtube.com/watch?v=yB0DdR1s89M&t=3132s |
| 2 | यशोगाथा (e-content) निर्मिती व लेखन- ऑनलाईन उदबोधन | https://www.youtube.com/watch?v=o0-dWFQSXwc |
| 3 | मुलभूत (Basic) आय.सी.टी. कौशल्य प्रशिक्षण व ऑनलाईन प्रश्नावली आधारित इ-प्रमाणपत्र वितरण | दिवस पहिला- https://www.youtube.com/watch?v=CDLCSkHL0mQ&t=3042s |
| | | दिवस दुसरा- https://www.youtube.com/watch?v=LjcfnhQWIR4&t=4564s |
| | | दिवस तिसरा- https://www.youtube.com/watch?v=jrYbeeAMieI&t=4017s |
| | | ऑनलाईन प्रश्नावली व इ-प्रमाणपत्र वितरण लिंक : https://forms.gle/sXBmBZXaZswMxK4U6 |
| 4 | अद्ययावत (Advance) आय.सी.टी. कौशल्य प्रशिक्षण व ऑनलाईन प्रश्नावली आधारित इ-प्रमाणपत्र वितरण | दिवस पहिला- https://www.youtube.com/watch?v=kY9b03JNYTY&t=3300s |
| | | दिवस दुसरा- https://www.youtube.com/watch?v=PRsXNnYIn0k&t=487s |
| | | दिवस तिसरा- https://www.youtube.com/watch?v=c6oXOInOxcI&t=1218s |
| | | ऑनलाईन प्रश्नावली व इ-प्रमाणपत्र वितरण लिंक : https://forms.gle/sXBmBZXaZswMxK4U6 |
| 5 | तालुकानिहाय आय.सी.टी. कक्षाच्या WhatsApp गटांची निर्मिती व माहिती प्रसारण | Section based Google form- नांव नोंदणी लिंक : https://forms.gle/T657tHsjXZ5emAbC8 |
| | | जिल्हास्तर ICT कक्ष WhatsApp गट : https://chat.whatsapp.com/Lkx4aD6S6noHt6Dx3U5LgW |
| | | रत्नागिरी तालुका ICT कक्ष WhatsApp गट : https://chat.whatsapp.com/Ez0q3XI7nt96ItBWb3inCB |
| | | राजापूर तालुका ICT कक्ष WhatsApp गट : https://chat.whatsapp.com/D29URDkhuSH1PkGWnynRiB |
| | | लांजा तालुका ICT कक्ष WhatsApp गट : https://chat.whatsapp.com/Ddd1W0jstw53xY92AWpg8Y |
| | | संगमेश्वर तालुका ICT कक्ष WhatsApp गट : https://chat.whatsapp.com/E75ABVpXyXJ6uCppqNEcEv |
| | | गुहागर तालुका ICT कक्ष WhatsApp गट : https://chat.whatsapp.com/FfS9f39akS8HAXeo0k1MoB |
| | | चिपळूण तालुका ICT कक्ष WhatsApp गट : https://chat.whatsapp.com/JoCm2vLBuRpL7HebG0jR72 |
| | | खेड तालुका ICT कक्ष WhatsApp गट : https://chat.whatsapp.com/BSjWRvqvmu97eSq9wUN65W |

| अ.नं. | उपक्रमाचे नांव | तक्ता क्र.5 : पुराव्याचा तपशील |
|---|---|---|
| | | दापोली तालुका ICT कक्ष WhatsApp गट :<br>https://chat.whatsapp.com/IAsiCny6gPd45553Dk5ubh |
| | | मंडणगड तालुका ICT कक्ष WhatsApp गट :<br>https://chat.whatsapp.com/EtpH2QiXNVaJrDPkInW82V |
| 6 | केंद्र , राज्य, जिल्हास्तरावरून येणाऱ्या उपक्रमांचे आय.सी.टी. कक्षामार्फत ऑनलाईन उदबोधन | शाळा स्वच्छता कृती आराखडा व कोबो ॲप्लिकेशन ऑनलाईन मार्गदर्शन :<br>https://www.youtube.com/watch?v=ivjuRUL4lYQ&t=32s |
| | | NAS 2021- Field Investigator ऑनलाईन प्रशिक्षण :<br>https://www.youtube.com/watch?v=K2lWC2M1qec&t=1294s |
| | | NAS 2021- Observer ऑनलाईन प्रशिक्षण :<br>https://www.youtube.com/watch?v=BzK0uB6k0kA&t=2847s |
| | | NAS 2021- Selected Schools ऑनलाईन प्रशिक्षण :<br>https://www.youtube.com/watch?v=LYXd1vFRF6A&t=646s |
| | | निष्ठा 2.0 ऑनलाईन मार्गदर्शन :<br>https://www.youtube.com/watch?v=VKPNF5eaL5s&t=1963s |
| | | निष्ठा 3.0 FLN ऑनलाईन मार्गदर्शन :<br>https://www.youtube.com/watch?v=roRrUHr-uiY&t=1301s |
| | | विद्यांजली वेब पोर्टल ऑनलाईन मार्गदर्शन :<br>https://www.youtube.com/watch?v=qDj1m5chF1Y&t=1117s |
| 7 | ICT आधारित आनंददायी शिक्षण- ऑनलाईन उदबोधन सत्र | https://www.youtube.com/watch?v=pRTdCcWV-tY&t=3885s |
| 8 | जिल्हा व तालुक्यांचे स्वतंत्र यु-ट्यूब चॅनेल व वार्षिक अंक आधारित फ्लिप बुक निर्मिती | DIET रत्नागिरी YouTube Channel लिंक :<br>https://www.youtube.com/@cmo792/streams<br>DIET रत्नागिरी वार्षिक अंक- फ्लिप बुक लिंक :<br>https://pubhtml5.com/umpu/ewva/ |
| | | रत्नागिरी तालुका YouTube Channel लिंक :<br>https://www.youtube.com/channel/UC7cjAlymlprMdj1oNDGP3vQ<br>रत्नागिरी तालुका वार्षिक अंक- फ्लिप बुक लिंक :<br>https://online.pubhtml5.com/bhtxc/wjxw/#.Yfvtxlf8iPo.gmail |
| | | राजापूर तालुका YouTube Channel लिंक :<br>https://youtube.com/channel/UCV13D4Q1DEhBTVNR3foaRJQ<br>राजापूर तालुका वार्षिक अंक- फ्लिप बुक लिंक :<br>https://online.pubhtml5.com/ndai/rntq/ |
| | | लांजा तालुका YouTube Channel लिंक :<br>https://youtube.com/channel/UCPiozDwQ251ALWrCuvsQd_A<br>लांजा तालुका वार्षिक अंक- फ्लिप बुक लिंक :<br>https://online.pubhtml5.com/evai/enaw/ |

| अ.नं. | उपक्रमाचे नांव | तक्ता क्र.5 : पुराव्याचा तपशील |
|---|---|---|
| | | संगमेश्वर तालुका YouTube Channel लिंक : https://youtube.com/channel/UChw0welFRiWMEzo2zpUxKhw संगमेश्वर तालुका वार्षिक अंक- फ्लिप बुक लिंक : https://online.fliphtml5.com/qzmyl/xaem/ |
| | | गुहागर तालुका YouTube Channel लिंक : https://youtube.com/channel/UCbliTFUEiCxeWPhXr7n2hnA गुहागर तालुका वार्षिक अंक- फ्लिप बुक लिंक : |
| | | चिपळूण तालुका YouTube Channel लिंक : https://www.youtube.com/channel/UC1vXmPafr0pgeiMrU2BbaXg चिपळूण तालुका वार्षिक अंक- फ्लिप बुक लिंक : |
| | | खेड तालुका YouTube Channel लिंक : https://www.youtube.com/channel/UCc_PEbyZ4BREepPdvqirlcg खेड तालुका वार्षिक अंक- फ्लिप बुक लिंक : https://online.pubhtml5.com/tzxt/pcjg/ |
| | | दापोली तालुका YouTube Channel लिंक : https://www.youtube.com/channel/UC5k_VjqekU_Z83_S78qMruw दापोली तालुका वार्षिक अंक- फ्लिप बुक लिंक : https://online.pubhtml5.com/gpkv/dbze/ |
| | | मंडणगड तालुका YouTube Channel लिंक : https://www.youtube.com/channel/UCIFMwxl_51NNkApf-Wgi5EQ मंडणगड तालुका वार्षिक अंक- फ्लिप बुक लिंक : |
| **9** | जिल्हास्तरीय आदर्श आय.सी.टी. शिक्षक पुरस्कार | ऑनलाईन पात्रता परीक्षा लिंक : https://forms.gle/Ra3UcEHWeUt2LMVN9 |
| | | पर्यवेक्षीय यंत्रणा शिफारस लिंक : https://forms.gle/rB82Kr6JtExVMTBAA |
| | | आदर्श आय.सी.टी. शिक्षक पुरस्कार फोटो/ व्हिडीओ/ PPT लिंक : https://shorturl.at/lnCW8 |
| | | सहभाग प्रमाणपत्र लिंक : https://forms.gle/gTcpy3i7Dtsh81iX8 |
| **10** | जिल्हास्तरीय आदर्श BRC सदस्य पुरस्कार | ऑनलाईन पात्रता परीक्षा लिंक : https://forms.gle/DMhfNXbK4Kt4wgdR7 |
| | | पर्यवेक्षीय यंत्रणा शिफारस लिंक : https://forms.gle/jR7ewcuUcwzUcBov5 |
| | | आदर्श BRC सदस्य पुरस्कार फोटो/ व्हिडीओ/ PPT लिंक : https://shorturl.at/tyR15 |
| | | सहभाग प्रमाणपत्र लिंक : https://forms.gle/gTcpy3i7Dtsh81iX8 |

आयसीटीविषयक विविध उपक्रमांचे पोस्टर्स














कार्यक्रम पत्रिका, आयसीटी पुरस्कार विजेते शिक्षक व BRC सदस्य




आयसीटी कीट व सन्मानचिन्ह




आयसीटी पुरस्कार टप्पे- दस्तऐवज तपासणी, प्रात्यक्षिक, मुलाखत



आयसीटी व BRC सदस्य पुरस्कार- एकत्रित छायाचित्र




आयसीटी शिक्षक पुरस्काराचे प्रमाणपत्र




BRC सदस्य पुरस्काराचे प्रमाणपत्र

## 5) नवोपक्रमाची कार्यपद्धती

## I. पूर्वस्थितीचे निरीक्षण व त्यांच्या नोंदी

यापूर्वी झालेल्या जिल्हा व तालुकास्तरीय तंत्रस्नेही शिक्षक प्रशिक्षणाचे अनुधावन करण्यात आले. जिल्ह्यातील 29 साधन व्यक्ती यांनी प्रत्येकी एक याप्रमाणे यादृच्छीक पद्धतीने 29 शाळा भेटी केल्या. पडताळा सूचीच्या आधारे निरीक्षण केले आणि प्राप्त माहितीतून सद्य:स्थिती लक्षात आली.

शिक्षकांकडे आय.सी.टी. कौशल्य कितपत आहे, कोणत्या बाबींवर मार्गदर्शन आवश्यक आहे तसेच शासन स्तरावरील आय.सी.टी. विषयक उपक्रमांची जाणीव-जागृती पाहण्यासाठी गुगल फॉर्म आधारित 25 प्रश्नांची पूर्व चाचणी घेण्यात आली. यामधून प्राप्त माहितीच्या नोंदी पुढीलप्रमाणे-

| प्रश्न क्र. | तक्ता क्र.6 : मोबाईल ॲप्लिकेशन्स | शिक्षक प्रतिसादाचे मुद्दे व संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रभावीपणे वापरत आहे | समाधान-कारकपणे वापरत आहे | माहित आहे पण वापरलेले नाही | माहित नाही | एकूण संख्या |
| 1 ते 11 | सरासरी शिक्षक प्रतिसाद संख्या | 8 | 39 | 65 | 11 | 123 |

| प्रश्न क्र. | तक्ता क्र.7 : शासन स्तरावरील ICT विषयक उपक्रम | शिक्षक प्रतिसादाचे मुद्दे व संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रभावीपणे वापरत आहे | समाधान-कारकपणे वापरत आहे | माहित आहे पण वापरलेले नाही | माहित नाही | एकूण संख्या |
| 12 ते 22 | सरासरी शिक्षक प्रतिसाद संख्या | 5 | 26 | 62 | 30 | 123 |

| प्रश्न क्र. | तक्ता क्र.8 : शिक्षकांचे मत | शिक्षक प्रतिसादाचे मुद्दे व संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | सांगता येत नाही | एकूण संख्या |
| 23 | वरील सर्व मार्गांचा वापर करून शाळा बंद असल्या तरी मुलांचे शिक्षण सुरु राहील याची खात्री वाटणारे शिक्षक | 85 | 4 | 34 | 123 |
| 24 | वरील सर्व मार्गांचा वापर करून शिक्षण सुरु ठेवण्यासाठी पालकांना यशस्वीपणे उदबोधन करता येईल असे वाटणारे शिक्षक | 76 | 9 | 38 | 123 |
| 25 | वरील सर्व मार्गांचा वापर करून शिक्षण सुरु ठेवण्यासाठी आपल्या अध्यापनाचे यशस्वीपणे नियोजन करता येईल असे वाटणारे शिक्षक | 76 | 4 | 43 | 123 |

**II. कार्यवाहीदरम्यान केलेली निरीक्षणे व माहिती संकलन**

1. मुलभूत (Basic) व अद्ययावत (Advance) आय.सी.टी. कौशल्यांवर आधारित प्रत्येकी तीन दिवसीय ऑनलाईन तंत्रस्नेही प्रशिक्षणाच्या अंमलबजावणीनंतर पुढील माहिती प्राप्त झाली-

<table>
<tr><th rowspan="2">अ.नं.</th><th rowspan="2">तक्ता क्र.9 :<br>उपक्रमाचे नांव</th><th colspan="3">ऑनलाईन सहभागी शिक्षक संख्या</th><th rowspan="2">प्रत्याभरण दिलेल्या शिक्षकांची संख्या</th><th rowspan="2">इ-प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या शिक्षकांची संख्या</th></tr>
<tr><th>दिवस-1</th><th>दिवस-2</th><th>दिवस-3</th></tr>
<tr><td>1</td><td>मुलभूत (Basic) आय.सी.टी. कौशल्यांवर आधारित ऑनलाईन तंत्रस्नेही प्रशिक्षण</td><td>3500</td><td>2200</td><td>1400</td><td rowspan="2">82</td><td rowspan="2">80</td></tr>
<tr><td>2</td><td>अद्ययावत (Advance) आय.सी.टी. कौशल्यांवर आधारित ऑनलाईन तंत्रस्नेही प्रशिक्षण</td><td>900</td><td>600</td><td>650</td></tr>
</table>

2. जिल्हा व तालुकानिहाय आय.सी.टी. कक्षाच्या WhatsApp गटांची निर्मिती केल्यानंतर जिल्ह्याच्या गटात एकूण 95 तर 9 तालुक्यांच्या गटात एकूण 370 प्राथमिक, माध्यमिक शिक्षक स्वयंस्फूर्तीने सहभागी झाले.
3. जिल्ह्याचे स्वतंत्र यु-ट्यूब चॅनेल स्थापित झाल्यानंतर त्यावरून अनेकविध उदबोधन सत्रे आयोजित करण्यात आली. यापासून प्रेरणा घेऊन 9 तालुक्याच्या BRC चे स्वतंत्र यु-ट्यूब चॅनेल स्थापित झाले. याप्रमाणेच DIET च्या वार्षिक अंक आधारित फ्लिप बुकचे प्रकाशन झाल्यानंतर यापासून प्रेरणा घेऊन 9 तालुक्याच्या BRC चे वार्षिक अंक आधारित फ्लिप बुकचेही प्रकाशन झाले. अनेक तज्ज्ञ व पर्यवेक्षीय यंत्रणा यांनी या उपक्रमास नावाजले.
4. एकूण चार टप्प्यांमध्ये निवड प्रक्रिया राबवून जिल्हास्तर आदर्श ICT शिक्षक पुरस्कार व जिल्हास्तर आदर्श BRC सदस्य पुरस्कार यासाठी जिल्ह्यातून एकूण 100 शिक्षक, पर्यवेक्षीय यंत्रणा, साधन व्यक्ती, नातेवाईक व पालक ऑफलाईन उपस्थित होते. एकूण 7 जणांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. समारंभामध्ये विजेत्यांच्या कामाची ओळख म्हणून प्रत्येकी 3 मिनिटांचे व्हिडीओ प्रदर्शित करण्यात आले त्यामुळे कार्यक्रम बहारदार झाला.

**III. उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरीक्षणे व त्यांच्या नोंदी**

आय.सी.टी. कक्षामार्फत राबविलेल्या विविध उपक्रमांमुळे शिक्षकांकडे आय.सी.टी. कौशल्य कितपत प्राप्त झाले आहे, तसेच शासन स्तरावरील आय.सी.टी. विषयक उपक्रमांची

जाणीव-जागृती पाहण्यासाठी पूर्व चाचणीत विचारलेल्या 25 प्रश्नांवर आधारित गुगल फॉर्म- उत्तर चाचणी घेण्यात आली. यामधून प्राप्त माहितीच्या नोंदी पुढीलप्रमाणे-

| **प्रश्न क्र.** | **तक्ता क्र.10 : मोबाईल ॲप्लिकेशन्स** | **शिक्षक प्रतिसादाचे मुद्दे व संख्या** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **प्रभावीपणे वापरत आहे** | **समाधान-कारकपणे वापरत आहे** | **माहित आहे पण वापरलेले नाही** | **माहित नाही** | **एकूण संख्या** |
| 1 ते 11 | सरासरी शिक्षक प्रतिसाद संख्या | 44 | 42 | 31 | 6 | 123 |

| **प्रश्न क्र.** | **तक्ता क्र.11 : शासन स्तरावरील ICT विषयक उपक्रम** | **शिक्षक प्रतिसादाचे मुद्दे व संख्या** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **प्रभावीपणे वापरत आहे** | **समाधान-कारकपणे वापरत आहे** | **माहित आहे पण वापरलेले नाही** | **माहित नाही** | **एकूण संख्या** |
| 12 ते 22 | सरासरी शिक्षक प्रतिसाद संख्या | 16 | 42 | 52 | 13 | 123 |

| **प्रश्न क्र.** | **तक्ता क्र.12 : शिक्षकांचे मत** | **शिक्षक प्रतिसादाचे मुद्दे व संख्या** | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **होय** | **नाही** | **सांगता येत नाही** | **एकूण संख्या** |
| 23 | वरील सर्व मार्गांचा वापर करून शाळा बंद असल्या तरी मुलांचे शिक्षण सुरु राहील याची खात्री वाटणारे शिक्षक | 68 | 35 | 20 | 123 |
| 24 | वरील सर्व मार्गांचा वापर करून शिक्षण सुरु ठेवण्यासाठी पालकांना यशस्वीपणे उदबोधन करता येईल असे वाटणारे शिक्षक | 96 | 16 | 11 | 123 |
| 25 | वरील सर्व मार्गांचा वापर करून शिक्षण सुरु ठेवण्यासाठी आपल्या अध्यापनाचे यशस्वीपणे नियोजन करता येईल असे वाटणारे शिक्षक | 103 | 7 | 13 | 123 |

## IV. कार्यवाही करताना आलेल्या अडचणी

1. आय.सी.टी. कक्षामार्फत विविध उपक्रम राबविताना नेटवर्क समस्या, झूम ॲपची 100 सहभागींची मर्यादा, इ. तांत्रिक समस्या जाणवल्या.
2. कोरोना कालावधीमुळे आय.सी.टी. कक्षाच्या ऑफलाईन सभा घेणे जमले नाही.
3. शिक्षकांच्या गरजांधिष्टीत आय.सी.टी. विषयक उपक्रमांची अंमलबजावणी करताना व्यक्तीभिन्नता लक्षात घेऊन शंकानिरसन, वैयक्तिक मार्गदर्शन करणे जमले नाही.

4. ऑनलाईन प्लॅटफॉर्मच्या नैसर्गिक व तांत्रिक मर्यादांमुळे काही उपक्रमांचे सखोल मार्गदर्शन करण्यात अडचणी आल्या.
5. सर्व उपक्रम शून्य खर्चात राबविले गेले तथापि काही उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी आर्थिक अडचणी आल्या.

**V. माहितीचे विश्लेषण : आलेख, तक्ते (आवश्यक वाटल्यास)**

सदरील नवोपक्रमाच्या माहितीचे विश्लेषण उद्दिष्टनिहाय पुढीलप्रमाणे केले आहे-

**1. पूर्वीच्या तंत्रस्नेही प्रशिक्षणाचे अनुधावन- पडताळा सूचीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

शैक्षणिक वर्ष 2019-20 मध्ये साधन व्यक्ती यांनी शाळा भेटी केल्या. त्यामध्ये त्यांनी वापरलेल्या पडताळा सूचीचे विश्लेषण पुढीलप्रमाणे केले आहे-


| अ. नं. | तक्ता क्र.13 : अनुधावनाचे मुद्दे | प्रतिसाद व त्यांची टक्केवारी | | |
|---|---|---|---|---|
| | | नेहमी | कधी कधी | कधीच नाही |
| 1 | अध्ययन-अध्यापनात विविध Andriod Apps चा वापर करतात का? | 10 (34%) | 17 (59%) | 2 (7%) |
| 2 | शैक्षणिक कामकाजासाठी विविध Educational Softwares चा वापर करतात का? | 5 (17%) | 23 (79%) | 1 (3%) |
| 3 | अभ्यासक्रमावर आधारित Video/ Audio/ Multimedia Programme तयार करतात का? | 16 (55%) | 0 (0%) | 13 (45%) |
| 4 | Genie/ Diksha/ Mitra App मधील E-Content चा वापर अध्यापनात करतात का? | 13 (45%) | 3 (10%) | 13 (45%) |
| 5 | स्वत:चा किंवा शाळेचा Blog/ Website/ YouTube Channel तयार केले असेल तर त्याचा वापर करतात का? | 5 (17%) | 10 (34%) | 14 (48%) |
| 6 | शाळेत सहकारी शिक्षकांना तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन करतात का? | 17 (59%) | 12 (41%) | 0 (0%) |
| 7 | केंद्र परिषदेत तंत्रज्ञानाधारीत अध्यापनावर मार्गदर्शन करतात का? | 16 (55%) | 12 (41%) | 1 (3%) |
| 8 | मुलांना विविध तंत्रज्ञान साधने हाताळण्याची संधी देतात का? | 18 (62%) | 9 (31%) | 2 (7%) |
| 9 | शालेय समस्या निराकरणासाठी तंत्रज्ञानाची मदत घेतात का? | 14 (48%) | 14 (48%) | 1 (3%) |
| 10 | नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा अध्यापनात वापर करताना शिक्षकांना समस्या/ अडथळे येतात का? | 20 (69%) | 7 (24%) | 2 (7%) |

वरील तक्त्याचे निरीक्षण केले असता असे अर्थनिर्वचन करता येते की,

1. 45% शिक्षकांना अभ्यासक्रमावर आधारित Video/ Audio/ Multimedia Programme तयार करता येत नाहीत.

2. 45% शिक्षकांना आपल्या अध्यापनात e-content चा वापर करता येत नाही.
3. 48% शिक्षक स्वत:चा किंवा शाळेचा Blog/ Website/ YouTube Channel अध्यापनात वापर करत नाहीत.
4. नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा अध्यापनात वापर करताना 69% शिक्षकांना समस्या/ अडथळे येतात.


**2. मुलभूत व अद्ययावत आय.सी.टी. प्रशिक्षणाच्या प्रत्याभरणासाठी भरून घेतलेल्या गुगल फॉर्म लिंकचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**




**आलेख क्र. 1**

वरील आलेख क्र.1 चे निरीक्षण केले असता असे अर्थनिर्वचन करता येते की, मुलभूत व अद्ययावत आय.सी.टी. प्रशिक्षणाच्या अंमलबजावणीनंतर घेण्यात आलेल्या चाचणीमध्ये एकूण 82 शिक्षकांना 30 पैकी सरासरी 15 (50%) गुण मिळाले आहेत.


**3. ICT आधारित आनंददायी शिक्षण- ऑनलाईन उदबोधन कार्यक्रम प्रत्याभरणासाठी भरून घेतलेल्या गुगल फॉर्म लिंकचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**




**आलेख क्र. 2**

वरील आलेख क्र.2 चे निरीक्षण केले असता असे अर्थनिर्वचन करता येते की, ICT आधारित आनंददायी शिक्षण- उदबोधन कार्यक्रम 661 पैकी 426 (64.40%) शिक्षकांना सर्व दृष्टीने अत्यंत उपयोगी ठरले.


**4. यशोगाथा (E-Content) निर्मिती व लेखन उदबोधन सत्र प्रत्याभरणासाठी भरून घेतलेल्या गुगल फॉर्म लिंकचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**




**आलेख क्र. 3**

वरील आलेख क्र.3 चे निरीक्षण केले असता असे अर्थनिर्वचन करता येते की, यशोगाथा निर्मिती व लेखन उदबोधन सत्र 59 पैकी 54 (91.50%) शिक्षकांना सर्व दृष्टीने अत्यंत उपयोगी ठरले.

**5. आदर्श ICT शिक्षक व BRC सदस्य पुरस्कार- पात्रता परीक्षाविषयक प्रत्याभरणासाठी भरून घेतलेल्या गुगल फॉर्म लिंकचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**





**आलेख क्र. 4**

वरील आलेख क्र. 4 चे निरीक्षण केले असता असे अर्थनिर्वचन करता येते की, जिल्हास्तर आदर्श ICT शिक्षक व BRC सदस्य पुरस्कार- पात्रता परीक्षाविषयक प्रत्याभरण लिंक भरलेल्या 162 पैकी 100 हून अधिक शिक्षक विभागनिहाय प्रश्नांची रचना, उद्दिष्टनिहाय आशयाचा दर्जा, परीक्षेचे नियोजन व व्यवस्थापन आणि वेळ व पारदर्शकता "उत्कृष्ट" होती असे म्हणतात.


**6. आय.सी.टी. कक्षामार्फत राबविलेल्या उपक्रमांची परिणामकारकता अभ्यासण्यासाठी आय.सी.टी. कौशल्य विषयक पूर्व चाचणी व उत्तर चाचणीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

| **तक्ता क्र.14 : चाचणी** | **सहभागी संख्या** | **प्रश्न संख्या** | **एकूण गुण** | **प्राप्त गुणांची सरासरी** |
|---|---|---|---|---|
| आय.सी.टी. कौशल्य विषयक पूर्व चाचणी | 123 | 25 | 25 | **8.91** |
| आय.सी.टी. कौशल्य विषयक उत्तर चाचणी | 123 | 25 | 25 | **15.11** |

| तक्ता क्र.15 : निकषनिहाय पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील शिक्षक संख्या व त्यांचे प्रमाण | | | | |
|---|---|---|---|---|
| **चाचणी** | **1 ते 10 गुण** मदतीची गरज (Below Basic) | **11 ते 15 गुण** मुलभूत (Basic) | **16 ते 20 गुण** समाधानकारक (Proficient) | **21 ते 25 गुण** अद्ययावत (Advance) |
| आय.सी.टी. कौशल्यविषयक पूर्व चाचणी ($O_1$) | 85 (69.11%) | 25 (20.33%) | 12 (9.76%) | 1 (0.81%) |
| आय.सी.टी. कौशल्यविषयक उत्तर चाचणी ($O_2$) | 19 (15.45%) | 51 (41.46%) | 34 (27.64%) | 19 (15.45%) |
| फरक ($O_2$- $O_1$) | -66 (-53.66%) | 26 (21.14%) | 22 (17.89%) | 18 (14.63%) |




**आलेख क्र. 5**




**आलेख क्र. 6**

वरील तक्ता क्र. 14 व तक्ता क्र. 15 तसेच आलेख क्र. 5 व आलेख क्र. 6 चे निरीक्षण केले असता आय.सी.टी. कौशल्य विषयक पूर्व चाचणी व उत्तर चाचणीतील शिक्षकांच्या प्रतिसादावरून असे अर्थनिर्वचन करता येते की,

1. मदतीची गरज असलेल्या (Below Basic) स्तरावरील शिक्षकांचे प्रमाण आय.सी.टी. कक्षामार्फत राबविलेल्या उपक्रमांमुळे 66 (53.66%) ने कमी झाले.
2. मुलभूत स्तरावर (Basic) असलेल्या शिक्षकांचे प्रमाण आय.सी.टी. कक्षामार्फत राबविलेल्या उपक्रमांमुळे 26 (21.14%) ने वाढले.
